अधिसुचना

क्रमांक. १९/२०२३ दिनांक : ०९/०२/२०२३

विषय :- **राजिव गांधी विज्ञान महाविद्यालय,मेहकर,जि.बुलडाणा या महाविद्यालयाचे बी.एस्सी.बायोइन्फॉर्मेटिक्स विद्याशाखेबाबत**...

संदर्भ :- शासन आदेश क्र.एनजीसी२००८/(२२१/०८)/मशि-३,दिनांक १८/६/२००८

सर्व संबंधीतांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी शासन निर्णय क्रमांक-२००८/(१८/०८)/मशि-३,दि.३०-०१-२००८ अन्वये श्री.विठ्ठल बहुउद्देशिय शिक्षण संस्था, चिंचोली बोरे,मु.पो.चिंचोली बोरे,ता.मेहकर,जि.बुलडाणा द्वारा संचालित राजिव गांधी विज्ञान महाविद्यालय,शिक्षक कॉलनी, डोणगांव रोड, मेहकर,जि.बुलडाणा या महाविद्यालयास बी.एस्सी.बायोइन्फॉर्मेटिक्स या विद्याशाखेसह व्यावसायिक म्हणुन मान्यता दिली होती. त्याअनुषंगाने विद्यापीठ पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-१६८०/२००८,दि.०३/१०/२००८ अन्वये सदर नविन महाविद्यालयास प्रथम संलग्निकरण देण्यात आले होते.

परंतु महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०२०/प्र.क्र.४९/मशि-४,दि.०६ जानेवारी २०२३ अन्वये श्री.विठ्ठल बहुउद्देशिय शिक्षण संस्था, चिंचोली बोरे,मु.पो.चिंचोली बोरे,ता.मेहकर,जि.बुलडाणा द्वारा संचालित राजिव गांधी विज्ञान महाविद्यालय, शिक्षक कॉलनी, डोणगांव रोड, मेहकर,जि.बुलडाणा या महाविद्यालयाच्या बी.एस्सी.बायोइन्फॉर्मेटिक्स या विद्याशाखेस शैक्षणिक सत्र २०२२-२३ पासुन पारंपारीक म्हणुन समजण्यात यावे.वरील शासन आदेशातील नमुद इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल होणार नाही.असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****